# <u>नि.दि.दा.क्र. ११६/२०११ मधील नि. ६१ वरील आदेश</u>
## <u>( रेखा राचगोंडा पाटील वि. द–याप्पा महादेव बाळुमाने वगैरे)</u>

१. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, रुल १७ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन त्यांच्या नि. १७ कडील कैफियतीमध्ये रे.दि.मु.नं. ५९/२०२१ चे अनुषंगे झालेल्या तडजोड पुरसीस अनुसार दुरुस्ती करणेस परवानगी मागितलेली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जान्वये कैफियत कलम ८ मध्ये ८अ नंतर ८ब अशी दुरुस्ती करुन खालील मजकुर कैफीयतीमध्ये नमूद करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

***"८ ब – अर्जातील कथन थोडक्यात असे की, प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी ता. ०६/११/२०१७ रोजीचे दुय्यम निबंधक, मिरज क्र. २, मिरज यांचे कार्यालयातील दस्त अनु.क्र. ३६७१/२०१७ अन्वयेचे विनामोबदला हक्कसोडपत्राचा दस्त प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मिरज येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तरसाो यांचे न्यायालयातील रे.दि.मु.नं. ५९/२०२१ याकामी झालेल्या तडजोड हुकूमनामाअन्वये रदद करुन घेतलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ बरोबरच दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. २ व ३ हे समाईकातील अविभक्त हक्क हिश्याचे मालक आहेत. अशा स्थितीत दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. २ व ३ यांचेही हक्क हिस्से आहेत."***

३. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना रे.दि.मु.नं. ५९/२०२१ चा तडजोडीचा हुकूमनामा झाल्या असल्याकारणाने प्रतिवादींना त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन घेणे भाग पडले आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या बचावात कोणताही फेरबदल होत नाही. सदरची दुरुस्ती ही कैफियतीशी सुसंगत अशीच आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती मंजूर केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरची दुरुस्ती नामंजूर केलेस या प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे व त्यामुळे प्रतिवादींना न्यायहक्कापासून वंचित रहावे लागणार आहे.

४. वादीने याकामी नि. ६५ कडे म्हणणे दाखल करून प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज नाकारलेला आहे. त्यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी प्रतिवादी क्र.

१ यांचेशी संगनमत करुन रे.दि.मु.नं. ५९/२०२१ चा दावा दाखल करुन त्याकामी संगनमताने तडजोड केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी याकामी कैफियत दाखल केल्यानंतर सुमारे १० वर्षानंतर दुरुस्ती मागितलेली आहे. त्यामुळे कैफियतच्या मूळ स्वरुपात बदल होणार असून दावेचे कामकाज लांबणीवर पडल्याची शक्यता आहे. तसेच प्रस्तुत दावेचे चौकशीकामी वादीने आपला सरतपासही दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज रददबातल होणेस पात्र आहे तसेच यदाकदाचित मे. कोर्ट अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस प्रतिवादींना जास्तीत जास्त दंड बसविणेत यावा असे म्हणणे वादीने दिलेले आहे.

५. प्रतिवादी क्र. १ व ६ यांनी नि. ६६ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज मान्य व कबूल केलेला आहे व दुरुस्ती करणेस त्यांची हरकत नसल्याचे कळविले आहे.

६. प्रतिवादींचा अर्ज वाचला. वादीचे व प्रतिवादी क्र. १ व ६ यांचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

७. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरस–निरस मानाने तुटक वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. रे.दि.मु.नं. ५९/२०२१ हा दावा मिळकतीसंदर्भातच असल्याने त्याकामी झालेला तडजोड हुकूमनामा व त्या अनुषंगे केलेली कथने ही प्रस्तुत दाव्याचा गुणावगुणावर अंतिम निकाल करणेस न्याययालास उपयोगी पडणार आहेत. याशिवाय सदरचा आपसातीचा हुकूमनामा हा दावा प्रलंबित असताना घडलेला असल्यामुळे व त्यामुळे वादी तसेच प्रतिवादींच्या भविष्यकालीन येणा–या कायदेशीर हक्क व हिश्श्यांमध्ये आमुलाग्र बदल करणारा असल्याने प्रतिवादी क्र २ व ३ यांनी मागितलेली दुरुस्ती आहे त्या स्थितीत मंजूर करणे न्यायोचित होईल. प्रतिवादीने सदरची दुरुस्ती ही Subsequent event वर आधारित मागितली असल्याने अर्जास खर्च लावणेचे कारण राहत नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात अगर मागितलेल्या दादीमध्ये आमुलाग्र बदल होईल असेही दिसत नाही. याउलट दुरुस्ती नामंजूर केलेस रे.दि.मु.नं. ५९/२०२१ व त्याकामी झालेला आपसातीचा हुकूमनामा यासंदर्भातील आवश्यक कथने रेकॉर्डवर न आल्याने वादातील प्रश्नांची अंतिमतः निर्गिती न होता पुन्हा

भविष्यात वाद प्रश्नांबाबत भविष्यकालीन दावे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदयस्थितीत प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मत नोंदवून हे न्यायालय पुढीलप्रमाणे आदेश पारीत करते.

**आदेश**

१. नि. ६१ कडील अर्ज खर्चाशिवाय मंजूर करणेत येतो.

स्वाक्षरीत/-

मिरज. (श्रीमती यु. पी. कोळी )

दि. ०९/१०/२०२१ ३रे सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. A.C. Patil (Grade-III) |
| Court | : | III$^{rd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 11/10/2021 |
| Judgment/Order uploaded on | : | 11/10/2021 |